राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ
'सेंट्रल प्रोव्हीन्सेस शासन शिक्षण विभागाची अधिसूचना क्रमांक ५१३ दिनांक १ ऑगस्ट, १९२३ द्वारा स्थापित व
महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ (सन २०१७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ६) द्वारा संचालित राज्य विद्यापीठ'

# आजीवन अध्ययन व विस्तार विभाग

गुरु नानक भवन, अंबाझरी वळणमार्ग, विद्यापीठ परिसर, नागपूर – ४४० ०३३ दूरध्वनी : २५३०८६०
ई-मेल : doll_rtmnu@gmail.com

क्र.आअविवि/२००/१८
दिनांक : २९/०१/२०१८

प्रति,
विस्तार सेवा कार्यात सहभागी महाविद्यालयांचे सन्माननीय प्राचार्य
आणि विद्यापीठाच्या शैक्षणिक विभागांचे सन्माननीय विभागप्रमुख,

विषय : माहिती संकलन प्रकल्प आणि राष्ट्रसंत संस्कार प्रकल्प वहयांचा मूल्यमापन कार्यक्रम.
(सत्र २०१७ –२०१८)

महोदय/महोदया,

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या आजीवन अध्ययन आणि विस्तार विभागांतर्गत लोकसंख्या शिक्षण आणि महिला अध्ययन सेवा केंद्रात सहभागी विद्यार्थ्यांनी सत्र २०१७–२०१८ मध्ये माहिती संकलन प्रकल्प आणि राष्ट्रसंत संस्कार प्रकल्पाच्या वहया एव्हाना तयार केल्या असतील . या प्रकल्प वहयांच्या मूल्यमापनाचा कार्यक्रम आता विद्यापीठ स्तरावर विविध ठिकाणी आयोजित करण्यात येत आहे. मूल्यमापन अनुभवी व ज्येष्ठ विषयतज्ज्ञांमार्फत करावयाचे आहे. मूल्यमापनाचे सविस्तर वेळापत्रक सोबत जोडले आहे.

आपणास विनंती आहे की, आपल्या महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या माहिती संकलन आणि राष्ट्रसंत संस्कार प्रकल्प वहया नमुद केलेल्या तारखेस मूल्यमापन स्थळी आणाव्यात.

प्रकल्प अहवाल आणतांना पुढील सूचनांचे पालन करून विभागास सहकार्य करावे.

१. महाविद्यालयातील कार्यक्रम अधिकाऱ्यांनी विद्यार्थ्यांच्या प्रकल्प वहया नजरेखालून घालतांना वहयांवर लाल पेननी कोणत्याही प्रकारची टीक करण्यात येऊ नये. त्यावर केवळ उत्कृष्ट, उत्तम, साधारण यापैकी कोणताही एक शेरा नमुद करुन त्यावर स्वाक्षरी करावी.
२. प्रत्येक विद्यार्थ्यांच्या प्रकल्प वहीवर महाविद्यालयाच्या मा. प्राचार्यांची स्वाक्षरी असणे अनिवार्य आहे. त्याकरीता कार्यक्रम अधिकाऱ्यांनी पुढाकार घ्यावा.
३. सोबत जोडलेल्या मूल्यमापन प्रपत्रामध्ये लोकसंख्या शिक्षण कार्यक्रम/महिला अध्ययन व सेवा केंद्रात सहभागी विद्यार्थ्यांची नावे लिहून त्यांच्या नावासमोर ३ पैकी गुण देण्यात यावे. प्रकल्प वहयांचे वर्गीकरण वर्गनिहाय आणि विषयनिहाय करुन त्याप्रमाणे वहयांचे गठ्ठे लावण्यात यावे. उदा. बी.ए. प्रथम, बी.कॉम प्रथम, बी.एस. सी प्रथम, एम. ए. प्रथम (इतिहास), एम. ए. प्रथम (सामाजशास्त्र), याप्रमाणे. प्रकल्पामध्ये सहभागी विद्यार्थ्यांची नावेच मूल्यमापन प्रपत्रामध्ये असावीत. सोबत लोकसंख्या शिक्षण कार्यक्रम/महिला अध्ययन सेवा केंद्र अशी दोन स्वतंत्र प्रपत्रे जोडली आहेत. सदर प्रपत्राच्या आवश्यक तेवढया झेरॉक्स प्रती काढून घेण्यात याव्यात. प्रपत्रावर महाविद्यालयाच्या कार्यक्रम अधिकाऱ्यांनी स्वाक्षरी करू नये. मूल्यमापनांती त्यावर विष्यतज्ञांची स्वाक्षरी राहील.
४. मूल्यमापन करण्यासाठी सोबत जोडलेल्या वेळापत्रकानुसार आपल्या महाविद्यालयाच्या नावासमोर नमूद केलेल्या तारखेस नियोजित स्थळी आणि नियोजित वेळी प्रकल्प अहवाल आणण्यात यावे.
५. मूल्यमापन झाल्यानंतर प्रोत्साहनपर गुणांची यादी त्याचवेळेस संबंधित कार्यक्रम अधिकारी अथवा प्रकल्प वहयांचे गठ्ठे घेऊन येणाऱ्या जबाबदार व्यक्तींकडे सोपविण्यात येईल.
६. प्रकल्प अहवाल मूल्यमापन स्थळी घेऊन येणाऱ्या व्यक्तिंना निरंतर, प्रौढ शिक्षण आणि विस्तार विभागाकडून कोणताही प्रवास खर्च दिला जाणार नाही. सदर प्रवास खर्च महाविद्यालयाच्या वतीने करण्यात यावा.
७. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या परीक्षा विभागाकडून प्रोत्साहनपर गुणांचे (Incentive Marks) परिपत्रक आणि विद्यार्थ्यांचे आसन क्रमांक (Roll No) महाविद्यालयांना प्राप्त होताच मूल्यमापन समितीकडून विद्यार्थ्यांना मिळालेले प्रोत्साहनपर गुण त्याच्या नावासमोर (Adult Education) च्या रकाण्यात नमूद करुन सदर प्रपत्र प्राचार्य आणि कार्यक्रम अधिकाऱ्यांच्या स्वाक्षरीसह मा. परीक्षा नियंत्रक, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर यांच्याकडे त्वरित पाठविण्यात यावे. ही विनंती.

सहकार्याच्या अपेक्षेत.

आपला विनीत

(डॉ. मोहन काशीकर)
संचालक